# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ८९ / २०२५

**वीज जोडणी खंडीत करण्याबाबत**

अशोक तुकाराम दुराफे ........................................................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, मंचर (महावितरण) ........................................ प्रतिवादी १

किरण मनोहर दुराफे ........................................................................ प्रतिवादी २

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) अशोक तुकाराम दुराफे
२) विराज अशोक दुराफे

प्रतिवादी १ तर्फे :- राहूल गवारे, कार्यकारी अभियंता, मंचर

प्रतिवादी २ तर्फे :- रोहीदास मारुती दुराफे

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ४ नोव्हेंबर २०२५

आदेश पारित दिनांक :- ३ डिसेंबर २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai. M.E.R.C.

मंच, महावितरण, पुणे परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ४ जुलै २०२५ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक ४ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

- *तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात येत आहे.*
- *सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध (कार्यालयीन) कायदेशीर विभागाकडून १५ दिवसाच्या आत तपासून पूर्णपणे प्रकरण तडीस न्यावे.*
- *सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, ग्राहक क्र.१७४२९००३७९५४ या कनेक्शनवरून इतर ठिकाणी पाण्याचा वापर होत असेल तर त्यावर विद्युत कायदा 2003 अन्वये त्यामधील तरतुदीनुसार कारवाई करणे.*
- *सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, या प्रकरणात दोषी कर्मचारी, अधिकारी यांची कंपनीच्या नियमानुसार सखोल चौकशी करणे.*

मंचाने असे निरीक्षण केले की, तक्रारदार तांनी त्यांच्या विहिरीवरून अनधिकृतपणे दिनांक १०.१२.१९८२ रोजी दिलेल्या कनेक्शनची तक्रार पहिल्यांदा दिनांक २७.0४.२0२४ ला केल्याचे उपलब्ध कागदपत्रांनुसार निष्पन्न होते. याचाच अर्थ तक्रारदार यांनी त्यांची तक्रार सुमारे २0 वर्षानंतर नोंदविल्याचे दिसून येते.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी अशोक तुकाराम दुराफे, हे गट क्रं ४५२ मौजे कुसूर, तालूका जून्नर, जिल्हा पुणे येथोल महावितरणचे ३ एचपी कृषी वीज ग्राहक (क्र.१७४२९०००१६७४) आहेत. अपिलार्थींची सदर ठिकाणी त्यांच्या मालकीची विहीर आहे. अपिलार्थीने सदर विहीरीवर वीज जोडणी दिनांक ४ डिसेंबर २०११ साली घेतली आहे. वीज जोडणीचा वीज देयकावरील विस्तृत तपशील खालीलप्रमाणे.

तक्ता १

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

| Name of Consumer | Consumer No. | Address on Bill | Sanctioned load | Date of Supply |
|---|---|---|---|---|
| Ashok Tukaram Durafe | 174290001674 | Gut no. 452, At & Post - Kusur, Junnar, Pin Code - 410 502 | 3 HP | 04.12.2011 |

अपिलार्थीच्या नावावर येणाऱ्या वीज देयकावर सात बारा उतारा गट नं ४५२ या पत्त्याची नोंद आहे.

- अपिलार्थीने नमुद केले की, त्यांच्या वडीलोपार्जीत ५ भाऊबंदकीची स्वतंत्र सामाईक गट क्रं ३३० मध्ये सामाईक विहीर आहे. त्यावर १९८२ सालापासून वीज जोडणी (क्र.१७४२९००३७९५४) घेतलेली होती (तथापि, सदरहू वीज जोडणी अनधिकृतरित्या गट नं ४५२ वर महावितरणच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून स्थलांतरीत केली आहे.) वीज जोडणीचा वीज देयकावरील विस्तृत तपशील खालीलप्रमाणे.

तक्ता २

| Name of Consumer | Consumer No. | Address on Bill | Sanctioned load | Date of Supply |
|---|---|---|---|---|
| Manohar Maruti Durafe | 174290037954 | Dist. Pune | 3 HP | 10.03.1982 |

(नोंद : सदरहू वीज देयकावर गट क्रमांकाचा उल्लेख नाही)

- गट नं ४५२ वरील अपिलार्थीच्या मालकीच्या विहीरीवर मनोहर मारुती दुराफे यांच्या नावाने वीज जोडणी दिल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आले. परंतू वीज देयकावर कोणत्याही स्वरूपाचा नाव पत्ता नसल्याने ती अनधिकृत वीज जोडणी आहे. सदर वीज जोडणीबाबत महावितरणकडे वेळोवेळी आक्षेप नोंदवूनही, घटनास्थळाची पाहणी करूनही सदर वीज जोडणी बंद केली नाही. अपिलार्थीची वीज जोडणी २०११ रोजी विहीरीवरील १२ नंबरच्या पोलवरून देण्यात आली. त्यामुळे १९८२ ची

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

वीज जोडणी १२ नंबरच्या पोलवरून सद्या अनधिकृतरित्या चालू असल्यामुळे ती काढून टाकावी अशी मागणी महावितरणकडे केली.

- मनोहर मारुती दुराफे हे मयत आहेत त्यांचा मुलगा किरण दुराफे याची गट नं ४५२ च्या बाजूची गट नं ४५३ ची जमीन ही अपिलार्थीने दिनांक ३० मे २०२२ रोजी विकत घेतली आहे. सदर जमीन मनोहर मारुती दुराफे किंवा त्याच्या वारसाची जमीन राहीलेली नाही. गट नं ४५३ मध्ये सुध्दा अपिलार्थीच्या विहीरीवरील पाणी पुर्वी वापरले जात नव्हते. सदर वीज जोडणीचा उपयोग मनोहर मारुती दुराफे किंवा त्यांचे वारसदार किरण दुराफे हे करत नव्हते. दोन ते तीन किलोमीटर दूर असलेल्या दुसराच माणूस तिसऱ्या माणसाच्या जमीनीला पाणी दत आहे. त्यामुळे सदरची वीज जोडणी कुठल्याही प्रकारे कायदयात बसत नाही. याबाबत महावितरणकडे वारंवार तक्रारी केल्या, महावितरणच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी जाऊन समजावून सांगितल्या, त्याप्रमाणे पुरावे देऊनही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही.

- मनोहर मारुती दुराफे यांचे गट क्र. ३३० वरील सामाईक विहीरीवरील वीज जोडणी १९८२ पासून चालू असताना त्यांनी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता तसेच महावितरणची व जमीन मालकाची (अपिलार्थीची) परवानगी न घेता सदरची वीज जोडणी अपिलार्थीच्या गट नं ४५२ वरील जमीनीवरील विहीरीवर त्यांच्या मर्जीने नजीकच्या काळात लावलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीने सदर तक्रार उशीराने २० वर्षांने केली असे होत नाही किंवा कालबाह्य होत नाही.

- अपिलार्थीने याबाबत दिनांक १४ मे २०२४ रोजी मंचाकडे अभिवेदन दाखल केले. मंचाने दिनांक ४ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये तक्रार फेटाळताना महावितरणला कायदेशीर कारवाई करून १५ दिवसाच्या आत तपासून पुर्णपणे प्रकरण तडीस न्यावे व वीज कायदा २००३ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले.

- अपिलार्थीने नमुद केले की, एका गटातील वीज जोडणी विनापरवाना, कोणत्याही कागदपत्राअभावी व पुरावाशिवाय बेकायदेशीरपणे दुसऱ्या गटातील विहिरीवर दाखवणे व त्याची तक्रार केल्यास ती कालबाह्य दाखवून फेटाळणे व सदर वीज जोडणी चालू ठेवल्यास अशा बाबींबर कोणाचाही अंकुश

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

राहणार नाही व सर्वत्र अनागोंदी कारभार चालू राहील त्यामुळे खऱ्या शेतकऱ्याचे नुकसान होत राहील.

- अपिलार्थीने दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी माननीय विद्युत लोकपाल कार्यालियात अभिवेदन दाखल करून वरील वस्तूस्थितीचा सहानभुतीपुर्वक व बारकाईने विचार करून बेकायदेशीर ग्राहक क्रं क्र.१७४२९००३७९५४ ची वीज जोडणी अपिलार्थीच्या गट नं ४५२ वरील विहीरीवरून ताबडतोब काढून टाकून होणाऱ्या नुकसानीपासून अपिलार्थीस वाचवावे ही विनंती केली.

३. प्रतिवादी १ महावितरण यांनी त्यांच्या उत्तरातील व दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी अशोक तुकाराम दुराफे, हे गट क्रं ४५२ मौजे कुसूर, तालूका जून्नर, जिल्हा पुणे येथील महावितरणचे ३ एचपी कृषी वीज ग्राहक (क्र.१७४२९०००१६७४) आहेत. अपिलार्थीची सदर ठिकाणी त्यांच्या मालकीची विहीर आहे. अपिलार्थीने सदर विहीरीवर वीज जोडणी घेतली आहे.

- **प्रतिवादी १ महावितरणने नमुद केले की, महावितरणच्या आपटाळे शाखा कार्यालियाने दिलेल्या स्थळ तपासणी अहवालानुसार सदर गट क्रं ४५२ मधील विहीरीवर २ वीज जोडणी अनुक्रमे श्री.अशोक तुकाराम दुराफे वीज ग्राहक (क्र.१७४२९०००१६७४) व मनोहर मारूती दुराफे ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ या दोघांच्या नावे असल्याचे आढळली. दोघाचा मंजूर भार हा ३ एचपी चा असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार अपिलार्थी अशोक तुकाराम दुराफे यांची मनोहर मारूती दुराफे यांच्या वीज जोडणीवर हरकत आहे. मनोहर मारूती दुराफे यांचा ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ हा असून तो सुरवातीपासून गट नं.४५२ मधील विहीरीवर असून सदरची वीज जोडणी दिनांक १० मार्च १९८२ रोजी देण्यात आला.**

- अशोक तुकाराम दुराफे यांच्या मते मनोहर मारूती दुराफे यांच्या नावे असलेली वीज जोडणी ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ असून **सदर वीज जोडणी गट नं. ३३० वरून गट नं.४५२ वरती बदलून नजीकच्या**

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

**काळात लावले याचा कोणताही ठोस पुरावा अपिलार्थीने सादर केलेला नाही.** सदर कागदपत्रे सादर झाल्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे प्रतिवादी १ ने नमुद केले.

४. प्रतिवादी २ किरण मनोहर दुराफे यांनी त्यांच्या उत्तरातील व दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थीने दाखल केलेले अभिवेदन खरे व प्रामाणीकपणाचे नाही. मंचाने दिलेले निर्णय योग्य व बरोबर आहे. मारूती मनोहर दुराफे यांना दिनांक १० मार्च १९८२ रोजी गट क्रं ४५२ मधील विहीरीवर वीज जोडणी दिलेलो आहे. त्यामुळे सदर तक्रारीस जवळपास २० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे म्हणजे कालबाह्य असल्याचे ठरवून मंचाने दिलेला आदेश योग्य व बरोबर आहे.


- सदर तक्रार ज्या वीज जोडणीसाठी (ग्राहक क्रं १७४२९००३७९५४) साठी दाखल केलेले आहे ती वीज जोडणी मनोहर मारूती दुराफे यांना एकत्रित हिंदू कुटूंबासाठी जवळपास ४२ वर्षापुर्वी घेतलेले आहे. अपिलार्थींना याची पुर्ण कल्पना होती. सदर वीज जोडणी रद्द करण्यासाठी दाखल केलेली तक्रार करण्यास जवळपास ४२ वर्षाचा विलंब झाला आहे. म्हणजे लॉ ऑफ लिमिटेशनची बाधा येत आहे. त्यामुळे अपिलार्थींच्या तक्रारीस कायदयाची बाधा येत आहे. या कारणावरून अपिलार्थी यांचे अपिल रद्द होण्यास पात्र आहे.

- अपिलार्थी सादर केलेल्या अपिलात आवश्यक पक्षकार सामिल केलेले नाहीत, त्यामुळे अपिलार्थी यांच्या अपिलास नॉन जॉइनडर ऑफ नेससरी पार्टीस या तत्वाचा देखील बाधा येत आहे. कारण अपिलार्थीने दाखल केलेला ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ हा मारूती मनोहर दुराफे यांनी त्यांच्या एकत्रित हिंदू कुटूंबासाठी घेतलेले वीज जोडणी होती, त्यामुळे हिंदू कायदयाप्रमाणे **कुटूंबातील संपुर्ण व्यक्तिचे सदर मालमत्तेवर हक्क व अधिकार आहेत.** त्यांना प्रतिवादी केल्याशिवाय अपिल चालू शकत नाही. सबब अपिलार्थी यांचे अपिल कायदयाने चालणारा नाही.

- मनोहर मारूती दुराफे यांची कारणापुरता वंशवेल खालीलप्रमाणे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.




- वरील वंशावळ हा अपिलार्थी म्हणजेच मुळ तक्रारदार व त्रयस्थ इसम यांचा आहे. वरील वंशावळीचा बारकाईने विचार केला असता अपिलार्थी हे प्रतिवादी २ यांचे भाऊबंद आहे. पुर्वी आमच्या शेतजमीनी होत्या व आहेत.

- अपिलार्थींनी सदर माहिती न्यायालयापासून लपवून ठेवली व त्याचे कारणही नमुद केले नाही. वास्तविक पाहता त्यांच्या संपुर्ण कुटूंबाची सदर वीज जोडणीसाठी आधीपासूनच परवानगी होती व आजही आहे. फक्त अपिलार्थी यांना जाणूनबुजून त्रयस्थ ईसमांच्या कुटूंबाला त्रास देण्यासाठी सदरचे अभिवेदन दाखल केले आहे. त्यास कोणतेही ठोस व कायदेशीर कारण घडलेले नाही. सबब अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- सदर वीज जोडणी घेतेवेळी मनोहर मारुती दुराफे यांनी योग्य ती कागदपत्रे महावितरणला दिल्यानंतरच त्यांनी वीज जोडणी (ग्राहक क्रं १७४२९००३७९५४) दिली व आजही ते चालू आहे. तसेच अविहतपणे मनोहर मारुती दुराफे यांचे कुटूंब सदर विहीर मिळकतीचा आजही वापर करते आहे. *(नोटः मारुती मनोहर दुराफे यांचे नावे सुधारीत ४५२ च्या सातबारावर नसल्याचे दिसून येते.)*
- प्रतिवादी २ यांनी नमुद केले की त्यांच्या उत्तरातील सर्व बाबींचा विचार करून अपिलार्थी यांचे अभिवेदन अपिल खर्चासह फेटाळण्यात यावे व अपिलाचा खर्च जाब देणार यांना अपिलार्थीकडून रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी फक्त तीन लाख फक्त) फक्त देण्याचा हुकूम व्हावा.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थीने नमुद केले की, गट क्रं ४५२ मौजे कुसूर, हा त्यांच्या मालकीचा आहे व तो त्यांच्या ताब्यात आहे. सदर ठिकाणी अपिलार्थीची स्वतंत्र विहीर आहे. त्या विहीरीवर अपिलार्थीने ३ एचपी ची वीज जोडणी (क्र.१७४२९०००१६७४) दिनांक ४ डिसेंबर २०११ रोजी घेतली. वीज जोडणीचा तपशील तक्ता १ मध्ये दर्शविलेला आहे. तसेच तेथील गट नं. ३३० मध्ये अपिलार्थीच्या वडीलोपार्जीत ५ भाऊबंदकीची स्वतंत्र सामाईक सामाईक विहीर आहे. त्यावर १९८२ सालापासून वीज जोडणी (क्रं १७४२९००३७९५४) घेतलेली आहे. सद्या त्या वीज जोडणीवर मनोहर मारुती दुराफे (प्रतिवादी क्र. २ चे वडील) यांचे नाव आहे. सदर वीज जोडणीचा तपशील तक्ता २ मध्ये दर्शविलेला आहे. **अंदाजे २०१५ या वर्षी गट नं. ३३० वरील वीज जोडणी गट नं. ४५२ वर बेकायदेशीर रित्या स्थलांतरीत करण्यात आली व गट नं. ४५२ वरील विहीरीचे पाणी सदर जागेपासून २ ते ३ किलोमीटर दुरच्या जमिनींना पाणी देण्यासाठी वापरण्यात येत आहे. त्यामुळे मुळ जमिन मालकाला पाण्याची मोठया प्रमाणात कमतरता जाणवत आहे.** सदर वीज जोडणीबाबत महावितरणकडे आक्षेप नोंदवूनही प्रतिवादी क्र.१ कोणतीही कारवाई करत नाही मंचाकडे तक्रार दाखल केली असता मंचाने सदर तक्रार फेटाळून लावली. सदर अनधिकृत वीज जोडणी तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात येत आहे व संपुर्ण प्रकरणाची तपासणी करून वीज कायदा २००३ आणि

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

प्रचलीत नियमानुसार दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अपिलार्थींचे नुकसान थांबवावे व भविष्यात अशी बेकायदेशीर वीज जोडणी होऊ नये याबाबत महावितरणला आदेशीत करण्यात यावे.

७. प्रतिवादी क्रं.१ नमुद केले की अपिलार्थी हे गट क्रं ४५२ येथ महावितरणचे ३ एचपी कृषी वीज ग्राहक (क्र.१७४२९०००१६७४) आहेत (तक्ता क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे). अपिलार्थींची सदर ठिकाणी त्यांच्या मालकीच्या विहीरीवर २०११ साली वीज जोडणी घेतली आहे. महावितरणच्या आपटाळे शाखा कार्यालियाने दिलेल्या स्थळ तपासणी अहवालानुसार सदर गट क्रं ४५२ मधील विहीरीवर २ वीज जोडणी अनुक्रमे श्री.अशोक तुकाराम दुराफे वीज ग्राहक (क्र.१७४२९०००१६७४) व मनोहर मारुती दुराफे ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ या दोघांच्या नावे असल्याचे आढळल. त्यानुसार अपिलार्थी अशोक तुकाराम दुराफे यांची मनोहर मारुती दुराफे यांच्या वीज जोडणीवर हरकत आहे. अशोक तुकाराम दुराफे यांच्या मते मनोहर मारुती दुराफे यांच्या नावे असलेली वीज जोडणी ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ असून सदर वीज जोडणी गट नं. ३३० वरून गट नं.४५२ वरती बदलून लावले याचा कोणताही ठोस पुरावा अपिलार्थीने सादर केलेला नाही. सदर कागदपत्रे सादर झाल्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे प्रतिवादी १ ने नमुद केले.

८. प्रतिवादी क्रं. २ ने नमुद केले की, अपिलार्थीने दाखल केलेले अभिवेदन खरे व प्रामाणीकपणाचे नाही. मंचाने दिलेले निर्णय योग्य व बरोबर आहे. तक्ता नं २ मध्ये दर्शविल्यानुसार मारुती मनोहर दुराफे यांना दिनांक १० डिसेंबर १९८२ रोजी गट नं ४५२ मधील विहीरीवर वीज जोडणी दिलेलो आहे. सदर तक्रार जवळपास ४२ वर्षापुर्वी घेतलेल्या वीज जोडणीसाठी दाखल केलेली आहे. अपिलार्थीने सदर वीज जोडणी रद्द करण्यासाठी दाखल केलेली तक्रार करण्यास जवळपास ४२ वर्षाचा विलंब झाला आहे. म्हणजे लॉ ऑफ लिमिटेशनची बाधा येत आहे. या कारणावरून अपिलार्थी यांचे अपिल रद्द होण्यास पात्र आहे. अपिलार्थी सादर केलेल्या अपिलात आवश्यक पक्षकार सामिल केलेले नाहोत, त्यामुळे अपिलार्थी यांच्या अपिलास नॉन जॉइनडर ऑफ नेससरी पार्टीस या तत्वाचा देखील बाधा येत आहे. कारण अपिलार्थीने दाखल केलेला ग्राहक क्रं १७४२९००३७९५४ हा मारुती मनोहर दुराफे यांनी त्यांच्या एकत्रित हिंदू कुटूंबासाठी घेतलेले वीज जोडणी होती. त्यामुळे हिंदू कायदयाप्रमाणे कुटूंबातील संपुर्ण व्यक्तिचे सदर मालमत्तेवर हक्क व अधिकार आहेत. कोणतेही ठोस व कायदेशीर कारण घडलेले नाही. वीज जोडणी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

घेतेवेळी मनोहर मारूती दुराफे यांनी योग्य ती कागदपत्रे महावितरणला दिल्यानंतरच त्यांनी वीज जोडणी (ग्राहक क्रं १७४२९००३७९५४) दिली व आजही तो चालू आह त्याचा मनोहर मारूती दुराफे यांचे कुटूंब सदर विहीर मिळकतीचा आजही वापर करते आहे. प्रतिवादी २ यांनी नमुद केले की त्यांच्या उत्तरातील सर्व बाबींचा विचार करून अपिलार्थी यांचे अभिवेदन अपिल खर्चासह फेटाळण्यात यावे.

९. अपिलार्थीची तक्रार ही त्यांच्या वीज जोडणीबाबत नसून ती प्रतिवादी २ यांच्या वीज जोडणीबाबतची आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० च्या कलम २.१(इ) अंतर्गत 'गाऱ्हाणेची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

> *"'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरू शकणाऱ्या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करने किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालांच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गाऱ्हाणे, यांचा समावेश होतो."*

तसेच वीज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

> *"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज पुरवठा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

वीज अधिनियम कायदा, २००३ प्रमाणे ग्राहकाची व्याख्या व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० गाऱ्हाणेच्या व्याख्येनुसार 'गाऱ्हाणेची' व्याख्या एकत्रीतपणे विचार करता ग्राहकाच्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; याबाबत गाऱ्हाणे नाही. **त्यामुळे, दुसऱ्या पक्षकाराबाबत या क्षणी गाऱ्हाणे विनियमानुसार ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेच्या कक्षेत बसत नाही.**

१०. अपिलार्थी अशोक तुकाराम दुराफे गट नं ४५२ चे मालक व वीज जोडणी (ग्राहक क्रं १७४२९००३७९५४) चे कै.मनोहर मारुती दुराफे हे एकमेकाचे भाऊबंध आहेत व ती वीज जोडणी वापरकर्ते रोहीदार मारुती दुराफे हे सुध्दा एकमेकाचे भाऊबंध आहेत. त्यामुळे या मंडळीनी एकत्र बसून वस्तूतः यावर तोडगा काढण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

सदर बाब ही दोन पक्षकारांमधील मतभेद हे सिव्हिल स्वरूपातील आहे. अश्या प्रकारच्या सिव्हिल हक्कांशी निगडीत तक्रारींचा निपटारा करण्यासाठी विद्युत लोकपाल हे योग्य न्यायासन नाही. या न्यायासनाला अशा सिव्हिल वादांवर निर्णय देण्याचा अधिकार नाही. त्याबाबत पुराव्याची पडताळणी करण्याची गरज असते. म्हणून अश्या प्रकरणात विद्युत लोकपाल या स्तरावर कोणताही निर्णय घेण्यास वाव राहत नाही. त्यामुळे अपिलार्थीस याबाबत योग्य त्या सिव्हिल कोर्टात जाण्याबाबत या न्यायासनाची पुर्ण मुभा (लिबर्टी) आहे.

११. मंचाने त्यांच्या दिनांक ४ जुलै २०२५ रोजीच्या आदेशात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही. सबब, मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

१२. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai. M.E.R.C.